## नियमित दिवाणी दावा क्र. ३६७/२०१६ मध्ये नि.क्र. ७४ व ७९ कडील अर्जावर सामाईक आदेश

१) गट क्र. ६३४ व १२९ मधील क्षेत्रातील प्रतिवादी क्र. ६ च्या नावे यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना लि. रेठरे बुद्रुक, ता. कराड यांच्याकडे गेलेल्या ऊसाचे बिल प्रतिवादी क्र. ६ यांना अदा करण्याबाबत कार्यकारी संचालक, यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना लि. रेठरे बुद्रुक यांना आदेशित करण्याकरीता प्रतिवादी क्र. ६ तर्फे निशाणी क्र. ७४ कडील अर्ज दाखल केला आहे. तसेच सन २०२२–२०२३ या सालामध्ये गट क्र. ६३४ व १२९ मधील प्रतिवादी क्र. ६ संतोष मोहिते यांच्या नावे गेलेल्या ऊसाच्या वजनाची पावती व बिलाची रक्कम व तसेच सन २०२२–२०२३ या सालामध्ये गट क्र. ६३४ व १२९ मधील प्रतिवादी क्र. १ प्रविण मोहिते यांच्या नावे गेलेल्या ऊसाच्या वजनाची पावती व बिलाची रक्कम याबाबतची कागदपत्रे दाखल करण्याकरीता कार्यकारी संचालक, यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना लि. रेठरे बुद्रुक यांना आदेशित करण्याकरीता प्रतिवादी क्र. ६ तर्फे निशाणी क्र. ७९ कडील अर्ज दाखल केला आहे.

२) निशाणी क्र. ७४ व ७९ कडील अर्जांवर म्हणणे देण्याबाबत प्रतिपक्षास आदेशित केले आहे. वादींनी निशाणी क्र. ७४ व ७९ कडील अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे निशाणी क्र. ७४ व ७९ कडील अर्ज वादींच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्याबाबत त्या अर्जांवर आदेश पारीत केला आहे.

३) प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांनी निशाणी क्र. ७४ कडील अर्जाचे म्हणणे निशाणी क्र. ७६ कडे दाखल केले आहे. तसेच प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांनी निशाणी क्र. ७९ कडील अर्जावरच त्या अर्जाचे म्हणणे दाखल केले आहे.

४) प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांच्या निशाणी क्र. ७६ कडील म्हणण्यातील कथनानुसार प्रतिवादी क्र. ६ यांनी निशाणी क्र. ७४ कडील अर्जामध्ये नमुद केलेली गट क्र. १२९ ही मिळकत दावा मिळकत नाही. गट क्र. ६३४ या मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांचे २७.४९ आर एवढे क्षेत्र आहे व प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचे सामाईकात २७.५१ आर एवढे क्षेत्र आहे. प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांनी त्यांच्या २७.४९ आर क्षेत्रात ऊसाचे पिक केले आहे व तसेच प्रतिवादी क्र. ६ यांनी त्यांच्या २७.५१ आर क्षेत्रात ऊसाचे पिक केले आहे. त्यामुळे कारखान्यास गेलेल्या ऊसापैकी १/२ बिलाची रक्कम प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांना व १/२ हिस्स्याची रक्कम प्रतिवादी क्र. ६ यांना मिळणे आवश्यक आहे. निशाणी क्र. ७९ कडील अर्जावर दिलेल्या म्हणण्यामध्ये प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांनी असे कथन केले आहे की, कारखाना या दाव्यात पक्षकार नाही व गट क्र. १२९ ही दावा मिळकत नाही व त्यामुळे अर्ज रद्द करावा.

५) प्रस्तुत अर्जाच्या कामी प्रतिवादी क्र. ६ व प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या युक्तीवादाकामी वादींना व वादींच्या विद्वान वकीलांना पुकारले असता गैरहजर असल्याने निशाणी क्र. ७४ व ७९ कडील अर्जांवर वादींचा युक्तीवाद नाही असा आदेश सदर अर्जांवर पारीत केला आहे. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

६) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादींनी प्रस्तुतचा दावा दावा मिळकतींच्या वाटपाकरीता व वादींच्या हिस्स्याचा अलग व तुटक ताबा मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी निशाणी क्र. ३३ कडे कैफीयत दाखल करुन व प्रतिवादी क्र. २, ३ व ५ यांनी निशाणी क्र. ५२ कडील पुरसिसद्वारे प्रतिवादी क्र. १ व ४ यांची कैफीयत स्वीकारुन वादींच्या दाव्यास विरोध केला आहे.

प्रतिवादी क्र. ६ यांनी निशाणी क्र. ४० कडे कैफीयत दाखल करुन वादींच्या दाव्यास विरोध केला आहे.

७) प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या निशाणी क्र. ३३ कडील कैफीयतीमधील कथनानुसार वादपत्राच्या परिच्छेद क्र. १अ मध्ये नमुद केलेल्या शेतजमीन मिळकतींचे सन १९९४ मध्ये वाटप झालेले आहे व त्या वाटपामध्ये ज्या मिळकती प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्या वाटणीस आल्या त्या मिळकतींमध्ये सदर प्रतिवादी क्र. १ ते ५ यांची स्वतंत्र कब्जे वहिवाट आहे.

८) प्रतिवादी क्र. ६ यांनी निशाणी क्र. ७४ कडील अर्जामध्ये असे कथन केले आहे की, सदर प्रतिवादी क्र. ६ यांनी गट क्र. ६३४ व १२९ मध्ये ऊसाचे पिक घेतले होते व दिनांक १६/०१/२०२२ ते दिनांक २०/०३/२०२३ या कालावधीत सदर प्रतिवादीने गट क्र. ६३४ व १२९ मधील एकूण ७१.८७८ टन ऊस यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना लि. रेठरे बुद्रक या कारखान्यास घातला होता. याउलट प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांच्या निशाणी क्र. ७६ कडील जबाबातील कथनानुसार गट क्र. १२९ ही मिळकत दावा मिळकत नाही. तसेच गट क्र. ६३४ या मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांचे २७.४९ आर एवढे क्षेत्र आहे व प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचे सामाईकात २७.५१ आर एवढे क्षेत्र आहे. प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांनी त्यांच्या २७.४९ आर क्षेत्रात ऊसाचे पिक केले आहे व तसेच प्रतिवादी क्र. ६ यांनी त्यांच्या २७.५१ आर क्षेत्रात ऊसाचे पिक केले आहे. प्रतिवादी क्र. ६ यांनी निशाणी क्र. ७४ कडील अर्जामध्ये गट क्र. ६३४ मध्ये प्रतिवादी क्र. ६ च्या ताब्यात किती क्षेत्र आहे व प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांच्या ताब्यात किती क्षेत्र आहे व प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांनी सन २०२२-२०२३ या सालामध्ये गट क्र. ६३४ मध्ये त्यांच्या ताब्यातील क्षेत्रामध्ये ऊसाचे पिक घेतले होते किंवा कसे याबाबत स्पष्टपणे कथन केले नाही. गट क्र. ६३४ या मिळकतीसह वादपत्राच्या परिच्छेद क्र. १अ मध्ये नमुद केलेल्या इतर

शेतजमीन मिळकतींचे वाटप झाले आहे किंवा कसे व कोणती मिळकत कोणाच्या वाट्याला गेली आहे व वादी हे त्यांनी विनंती केल्याप्रमाणे दावा मिळकतींचे वाटप करुन मिळण्यास पात्र आहेत किंवा कसे ही बाब दाव्याच्या पुराव्याअंती निश्चित होणार आहे. तसेच गट क्र. ६३४ मधील मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. ६ व प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांच्या ताब्यात नेमके किती क्षेत्र आहे व कारखान्यास गेलेला ऊस नेमक्या कोणाच्या ताबा वहिवाटीच्या क्षेत्रातील आहे याबाबतचा नेमका पुरावा अभिलेखावर असल्याशिवाय कोणता प्रतिवादी ऊसाचे किती बिल मिळण्यास पात्र आहे हे निश्चित करता येणार नाही. त्यामुळे वरील नमुद कारणांमुळे माझ्या मते गट क्र. ६३४ व १२९ मधील क्षेत्रातील यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना लि. रेठरे बुद्रुक, ता. कराड यांच्याकडे गेलेल्या ऊसाचे बिल प्रतिवादी क्र. ६ यांना अदा करण्याबाबत कार्यकारी संचालक, यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना लि. रेठरे बुद्रुक यांना आदेशित करण्याबाबत प्रतिवादी क्र. ६ यांनी निशाणी क्र. ७४ कडील अर्जामध्ये केलेली विनंती या प्रकरणामध्ये या स्थितीला समर्थनीय नाही. तसेच प्रतिवादी क्र. ६ यांनी निशाणी क्र. ७४ व ७९ कडील अर्जांमध्ये नमुद केलेली गट क्र. १२९ ही मिळकत प्रस्तुत दाव्यामध्ये समाविष्ट नाही. तसेच माझ्या मते गट क्र. ६३४ व १२९ मधील क्षेत्रातील ऊस प्रतिवादी क्र. ६ च्या नावे कारखान्यास गाळपासाठी पाठविला असल्यास सदर ऊसाच्या वजनाबाबतची पावती प्रतिवादी क्र. ६ हा स्वत: कारखान्याकडून प्राप्त करुन घेऊ शकतो. त्यामुळे वरील नमुद कारणांमुळे माझ्या मते सन २०२२–२०२३ या सालामध्ये गट क्र. ६३४ व १२९ मधील प्रतिवादी क्र. ६ संतोष मोहिते यांच्या नावे गेलेल्या ऊसाच्या वजनाची पावती व बिलाची रक्कम व तसेच सन २०२२–२०२३ या सालामध्ये गट क्र. ६३४ व १२९ मधील प्रतिवादी क्र. १ प्रविण मोहिते यांच्या नावे गेलेल्या ऊसाच्या वजनाची पावती व बिलाची रक्कम याबाबतची कागदपत्रे दाखल करण्याकरीता

कार्यकारी संचालक, यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना लि. रेठरे बुद्रुक यांना आदेशित करण्याबाबत प्रतिवादी क्र. ६ यांनी निशाणी क्र. ७९ कडील अर्जामध्ये केलेली विनंती समर्थनीय नाही. त्यामुळे वरील नमुद कारणांमुळे माझ्या मते निशाणी क्र. ७४ व ७९ कडील अर्ज या प्रकरणामध्ये या स्थितीला समर्थनीय नाहीत व ते नामंजुर होण्यास पात्र आहेत. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## **आदेश**

१) निशाणी क्र. ७४ व ७९ कडील अर्ज नामंजुर करण्यात येतात.

२) या अर्जांचा खर्च ज्याचा त्याने सोसण्याचा आहे.

३) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.10.09 17:41:35 +0530

दिनांकः– ०९/१०/२०२४ (पां. लिं. घुले)

ठिकाणः– कराड २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.